ISSN-2277-4491

# VIBGYOR

Bi-annual Multi Disciplinary Research Journal
Volume VII No. 1 February 2018



- **VIBGYOR**

  Bi-annual Multidisciplinary Research Journal
  Volume VII / No. 1, February 2018

- Published By
  **Research Journal Publication Committee**
  Bhiwapur Mahavidyala, Bhiwapur
  Dist. Nagpur - 441201(M.S.) India
  Ph. : No. 07106-232349, 9423602502, 9422829240
  E-mail : vibgyorbmv@yahoo.in
  Website : www.bgm.ac.in

- **UGC Approved List of Journals**
  **Journal No. 46447**

- **ISSN-2277-4491**

- **Special Edition : February 2018**


- **© Author**
  Copyright © All rights are reserved. No part of this publication may be reproduced, stored in a retrival system or transmitted in any form or by any means electronic, mechanical, photocopying, recording or otherwise without prior permission of the Editor.

  The papers included in this publication have been directly reproduced, with minimum editorial intervention, from the files sent by the respective authors. Opinions expressed in the research papers are those of contributors and do not necessarily match the views of Research Journal Committee of the college. The Publisher or Editorial Board is not responsible for any information contained therein.


- **Type Setting**
  **Scan Dot Computer,**
  Mahal, Nagpur Mobile : 9822565782
  E-Mail : aakar100@gmail.com

# अनुक्रमणिका


१. सिंदखेडकर जाधवांची ऐतिहासिक कामगिरी — प्रा. डॉ. शरद आर. डवरे ........ ७
२. यशवंत मनोहर यांची कविता — डॉ. जगदिश्वर मुरारी मेश्राम ........ १०
३. भारतीय शेतकरी आणि भारतीय कृषी विषयक धोरण — प्रा.डॉ. राजेश पी. कांबळे ........ १३
४. नोंटबंदीमुळे अर्थव्यवस्थेवर होणारा परिणाम — प्रा. डॉ. सुरेंद्र पोथारे ........ १७
५. आमनेर किल्ला - एक ऐतिहासिक दृष्टीक्षेप — प्रा. डॉ. विलास भा. फरकाडे ........ १९
६. महात्मा ज्योतिबा फुलेंचा सामाजिक विचार — प्रा. डॉ. लखपती वा. गायकवाड ........ २२
७. चिमूरचे श्रीहरी बालाजी मंदीर : ऐतिहासिक दर्शन — प्रा. डॉ. नथ्थु सिताराम गिरडे ........ २५
८. कुसमायोजित विद्यार्थ्यांच्या विविध समस्या, उपाययोजना व पालकांची भुमिका — डॉ. सौ. शुभांगी अ. रोडे ........ २७
९. नागपूर जिल्ह्यातील म्हाडाच्या मध्यम उत्पन्न गटातील गाळ्यांचे गृहआयोजन सिध्दांतानुसार मूल्यमापन — डॉ. सुजाता साखरे ........ ३०
१०. नागपूर जिल्ह्यातील धर्मांतरीत बौध्दाच्या आर्थिक समस्या — प्रा. किशोर जगन्नाथ शेन्डे, डॉ. सुनिल शिंदे ........ ३३
११. नागपूर जिल्ह्यातील पेंच जलसिंचन प्रकल्पाअंतर्गत येणाऱ्या गावातील शेतकऱ्यांच्या सामाजिक स्थितीचे विश्लेषणात्मक अध्ययन — विजय मारोतराव रांडे, डॉ. सतिश पुंडलीकराव डुडुरे ........ ३५
१२. बंजारा समाजातील राजकीय स्थित्यंतरे — डॉ. मोतीराज रा. चव्हाण ........ ३९
१३. विदर्भातील पर्यटन क्षेत्रात होत असलेल्या विकासात्मक प्रयत्नांचा आढावा व विकाससंबंधी स्थानिक नागरीकांच्या अभिवृत्तीचे अध्ययन — प्रा. डॉ. दिलीप चव्हाण ........ ४२
१४. ग्रामीण कृषी उद्योग आणि लहान शेतकऱ्यांचा विकास : समस्या आणि आव्हाने — डॉ. गजानन भा. पाटील ........ ४५
१५. खेळाडूवर आहाराचा प्रभाव — प्रा. आदित्य किशोर सारवे ........ ५०
१६. नागपूर शहरातील औद्योगिक प्रतिष्ठानाकडून सी.एस.आर. योजनेमार्फत राबविण्यात येणारे विविध कार्यक्रमाचे अध्ययन — डॉ. अशोक धोटे ........ ५२
१७. ऐतिहासिक कागदपत्रांची निवड — डॉ. महेंद्र गायकवाड ........ ५५
१८. बाबु हरिदास आवळे व कामगार चळवळ : एक समिक्षात्मक अध्ययन — प्रा. डॉ. सी. एस. पाटिल ........ ५८
१९. भंडारा जिल्ह्यातील साहित्य कलेत गुंतलेला आदिम समाज — डॉ. मधुकर वि. नंदनवार ........ ६२
२०. भंडारा जिल्ह्यातील स्त्रियांची अप्रकाशित लोकगीते — सदानंद कोठीराम जांगळे ........ ६५
२१. भंडारा जिल्ह्यातील अप्रकाशित लोकगीतांचे वाङ्मयीन सौंदर्य — सदानंद कोठीराम जांगळे ........ ६७
२२. महिला सशक्तीकरण : एक दृष्टीकोन — प्रा. डॉ. विमल राठोड ........ ६९
२३. शालेय वातावरणाचा व्यक्तीमत्वावर पडणारा प्रभाव: एक विश्लेषण — प्रा. डॉ. अनिता विवेक महावादीवार ........ ७२
२४. बदलत्या युगातील "शिक्षक ग्रंथपाल" - एक सर्वेक्षण — प्रा. प्रेमा ए. कुभंलकर ........ ७६
२५. यशवंत मनोहर यांच्या कवितेची भाषा — वैशाली धनविजय ........ ७९
२६. गौतम बुदधाचा स्त्रीविषयक दृष्टिकोण — डॉ. दीपाली डी. भावे ........ ८२
२७. मानवी अधिकार आणि एड्स — प्रा. डॉ. विठ्ठल घिनमिने ........ ८४
२८. मराठी नाटकांचे सांस्कृतिक योगदान — डॉ. रवींद्र शोभणे ........ ८६
२९. युगपुरुष शिवराय : एक आकलन — प्रा. डॉ. प्रफुल्ल तु. बन्सोड ........ ८८
३०. लोकमाता अहिल्यादेवी होळकर — प्रा. प्रफुल एम. राजुरवाडे ........ ९२
३१. स्थानिक नागरीकांच्या अभिवृत्तीचे अध्ययन
३२. विदर्भातील पर्यटन क्षेत्रात होत असलेल्या विकासात्मक प्रयत्नांचा आढावा व विकाससंबंधी — प्रा. हरेश टि. गजभिये ........ ९४
३३. जागतिकीकरण आणि सामाजिक प्रश्न — डॉ. रवींद्र शोभणे, डॉ. अनिल बोपचे ........ ९७
३४. विदर्भ के मुस्लिम बहुल क्षेत्र के छात्रों की सामाजिक एवं आर्थिक परिस्थिती का-उनकी अभिवृत्ति पर होने वाले परिणामों का अध्ययन — नाजिश इरम तुफैल अशर, डॉ. एन.ए. काजी ........ ९९
३५. डॉ. बाबासाहब आम्बेडकर के नागपूर धम्मदीक्षा समारोह में बामनराव गोडबोले का योगदान — डॉ. सुर्यकांत महादेवराव कापशीकर ........ १०१
३६. बुध्द और उनका अष्टांग मार्ग — डॉ. अतुल महाजन ........ १०३

# नागपूर जिल्ह्यातील धर्मांतरीत बौध्दाच्या आर्थिक समस्या

संशोधक
❑ प्रा. किशोर जगन्नाथ शेन्डे
पुष्पक महाविद्यालय, उमरेड
मार्गदर्शक
❑ डॉ. सुनिल शिंदे
भिवापूर महाविद्यालय, भिवापूर

१४ ऑक्टोबर १९५६ या दिवशी नागपुरला डॉ. बाबासाहेब आबेडकरानी ५,००,००० पेक्षा जास्त हिंदुना बौध्द धर्माची दिक्षा दिली याअगोदर स्वता प्रथम महास्थविर चंद्रमणी या बौध्द भंत्तेकडुन बौध्द धर्माची दिक्षा घेतली. दुसऱ्या दिवशी १५ ऑक्टोबर १९५६ ला ३,००,००० दलीत हिदुना डॉ. बाबासाहेब आबेडकरानी बौध्द धर्माची दिक्षा दिली भारत देशातिल अस्पृश्य समाजाला डॉ. बाबासाहेब आबेडकरानी दिलेली बौध्द धर्माची दिक्षा हि आधुनिक भारतातील महान क्रांति आहे.

महाराष्ट्रतील एकुण लाकसंख्यामध्ये १० टक्के महार जाती आहेत. आणि सर्वच महार जवळपास बौध्द धर्मात धर्मातरीत झाली आहे महाराष्ट्रात एकुण लोकसंख्येच्या १६ टक्के बौध्द व महार आहेत. तसेच २५ ऑक्टोबर २०१६ यादिवशी ५००० ओबीसी हिंदु लोकानी नागपूर येथील दिक्षा भुमीवर बौध्द धर्माचा स्वीकार केला त्यामुळे बौध्द धर्माच्या लोकसंख्येत सतत वाढ होताना दिसत आहे.

२०११ च्या जनसंख्येनुसार नागपूर जिल्ह्याची एकुण लोकसंख्या ४६,५३,५७० इतकी आहे यमध्ये पुरूषाची संख्या २३,८४,९७५ आणि स्त्रीयांची संख्या २२,६८,५९५ इतकी आहे नागपुर जिल्ह्यात बौध्द धर्माची एकुण लोकसंख्या ६,६८०५० इतकी आहे एकुण लोकसंख्येमध्ये हे प्रमान १४.३६ टक्के आहे हे प्रमान हिंदु नंतर सर्वात जास्त प्रमान आहे.

हजारो शतकापासुन गुलामी आणि लाचारित जीवन जगत असलेल्या समाजातील युवकांना माणूस म्हणून उभे राहण्यासाठी सर्वप्रथम गरज असते एका समाजाची, समाजाच्या सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक आणि राजकीय उन्नतीसाठी गरज असते संघटीत समाजाची असा संघटीत समाज डॉ. बाबासाहेब आबेडकरांनी धर्मांतर करूण निर्माण केला.

संघर्षाशिवाय काहीही प्राप्त होत नाही म्हणून या समाजाला भविष्यातही कायम संघर्ष करावा लागेल या शोषित दलित समाजाला धर्मांतराअगोदर स्वतःच्या हक्कासाठी संघर्ष करावा लागला आणि धर्मांतर होऊन सुध्दा हा संघर्ष कमी झाला नाही. या देशातील मनुवादी ब्राम्हणानी या लोकांची कायमच अव्हेलना केली आहे. जाणीवपूर्वक या समाजाची आर्थिक पिळवणूक केली आहे.

**आर्थिक समानतेसाठी संघर्षाची कारणे :-**

**१) देशाची समाजरचना :-**

भारत देशात ब्राम्हणानी आपला वैयक्तीक स्वार्थासाठी देशातील समाजाचे चार वर्णात विभागणी केली. ब्राम्हण, क्षत्रीय, वैश्य, शुद्र, अशी प्रत्येक वर्णाच्या त्यांच्या स्तरानुसार कामाची विभागणी केली त्यामुळे त्याच्या कामाच्या स्तरानुसार समाजाची अनेक जातीत विभागल्या गेल्या त्यामुळे शुद्रांचा कायमच त्याचा विकास जाणीवपूर्वक रोखण्यात आला.

**२) आर्थिक नाकाबंदी :-**

मानव समाजाचे कल्याण साध्य करण्यासाठी मुद्रा हे एक भौतिक माध्यम आहे मुद्रा प्राप्ती करने या देशात साधी गोष्ट नव्हती. प्रत्येक जातीला त्याच्या वाट्याला आलेला व्यवसाय करावा लागत असे शुद्र वर्णात अनेक जाती असून या शुद्रातील अतीशुद्र या वर्गाला इतर श्रेष्ठ वर्णाचे सेवा, चाकरी करने नशीबी आली. ही जाणीवपूर्वक आर्थिक नाकाबंदी असुन यामुळे या वर्गाला धर्मातरानंतर सुध्दा आर्थिक समानतेसाठी कायम संघर्ष करावा लागत आहे.

**३) आप्तसंबंधीयांना नौकरीत स्थान :-**

श्रेष्ठ-कनिष्ट मानणाऱ्या या देशात जरी धर्मांतरीत बौध्दानी शिक्षणात मोलाची कामगिरी जरी केली असेल तरी मोक्याच्या जागा त्याना मिळत नाही आणि ज्याना मिळाली त्याना त्या नौकरीत टिकु देत नाही अशा मनोवृत्तीची मानसे असल्याकारणांनी धर्मांतरीत बौध्दाची आजही पिळवणुक होत आहे.

**४) श्रेष्ठ-कनिष्टाची भावना :-**

भारतात एक जाती दुसऱ्या जातीला आपल्यापेक्षा कनिष्ठ आहे या भावनेत वाढ झाली आणि समाज जातीच्या नावाने दोन वर्गात म्हणजे श्रेष्ठ-कनिष्ठ या वर्गात विभागला गेला. त्यामुळे,समाजातील उच्च जातीच्या विकासाच्या मानाने कनिष्ठ जातीचा विकास होऊ शकला नाही.

**५) जाती आधारे व्यवसायाची निवड :-**

कोणत्याही मनुष्याला कोणताही व्यवसाय करण्याचे स्वातंत्र्य ज्या देशात नसेल त्या देशात जाती आधारेच व्यवसायाची निवड करावी लागते. त्यामुळे भारत देशात प्रत्येक व्यक्तीला त्याच्या जाती आधारे जन्मतः व्यवसाय मिळाला आहे. त्यामुळे भारतात आर्थिक विषमता मोठ्या प्रमाणात दिसुन येते.

**६) पिढ्यांपिढ्या होणारे शोषण :-**

भारतात जी धर्मांतराची लाट सुरू झाली त्याचे मुळ कारण

म्हणजे येथील शोषित समाजाचे कित्येक पिढ्यांपारून शोषण होत असे. पण हे शोषण डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नेतृत्वामध्ये या पिळवणुकीतून स्वतःची सोडवणूक करण्यासाठी लढा देण्यास सुरूवात केली आणि स्वतःची यातून सुटका करण्यास आजही हा शोषीत वर्ग संघर्ष करीत आहे.

**धर्मांतरित बौध्दांच्या आर्थिक समस्या :-**

**१) आर्थिक उत्पन्नाची समस्या :-**

या देशात जा समाजाला श्रेष्ठ समाजाने सदैव आर्थिक दारिद्यात ठेवले. त्या समाजाला धर्मांतरानंतर सुध्दा त्यांना आर्थिक उत्पन्नाच्या प्राप्ती करीता कोणता व्यवसाय करावा हा प्रश्न आज ही त्यांच्या पुढे पडतो. देशातील ४७ कोटी जनता अशा प्रश्नांना समोरे जात आहे. कारण कोणताही जरी व्यवसाय करायचा म्हटंला की लागणारे भांडवल कसे जमवायचे या प्रश्नाची सोडवणूक आयुष्यभर होत नाही.

**२) उत्पादन साधनांची समस्या :-**

कोणत्याही व्यवसाय म्हटला की त्या व्यवसायाकरीता उत्पादनाची अनेक साधनांची आवश्यकता असते अशी साधनांची जुडवाजुडव करणे. या सर्वांची कसरत करणे म्हणजे स्वतः कडे तेवढे भांडवल जवळ असणे आवश्यक आहे. कारण कोणतेही उत्पादन घटकाला त्या त्याच्या कामाच्या मोबदल्यात काही मोबदला द्यावा लागतो. त्यामुळे उत्पादन साधनांची समस्या ही या वर्गाला पडत असते.

**३) मुलभूत गरजांची समस्या :-**

मनुष्याला जीवन जगतांना आवश्यक असणाऱ्या मुलभुत गरजा पूर्ण होणे आवश्यक असते. त्यात अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण, आरोग्य या गरजा तर सोडाच पण पोटभर अन्न खायला मिळत नाही. ज्या समाजाला दुसऱ्याच्या उष्ट्या अन्नावर अवलंबून राहावे लागते. त्यामुळे या समाजाची परिस्थिती बदलतांना दिसत नाही.

**४) शिक्षणाची समस्या :-**

या समाजात आर्थिक उन्नती झाली नसल्याने शिक्षणसाठी त्याच्याकडे पुरेसा पैसा नसल्याकारणाने उच्च शिक्षण घेऊ शकत नाही. त्यामुळे यांना शिक्षणापासून वंचित राहावे लागत आहे. तसेच ग्रामीण भागात लहान मुल शिक्षणापासून दूर जाऊ लागले.

**५) स्थलांतरातून निर्माण होणाऱ्या समस्या :-**

धर्मांतरित बौध्दांनी स्वतःच्या विकासासाठी व काम धंद्यासाठी त्या स्थलांतर करावे लागते. पण स्थलांतरानंतर अनेक समस्या निर्माण होतात. त्यात वास्तव्याची समस्या, मुलांची शिक्षणाची समस्या आणि वास्तव्य व कामाचे ठिकाण यातील अंतराची समस्या त्याच प्रमाणे नविन भुप्रदेशातील समाज स्थलांतरीत लोकांनकडे वाईट दृष्टीने बघतात. त्यामुळे अनेक समस्यांना समोरे जावे लागते.

**६) उद्योगाला ग्राहक वर्गाची समस्या :-**

धर्मांतरीन समाजाने एखादा उद्योगधंदा जरी सुरू केला तरी अशा उद्योग मालाला खरेदी करणारा ग्राहक वर्ग मिळत नाही. कारण समाजात श्रेष्ठ कनिष्ठ वर्ग मानत असल्याने कनिष्ठ वर्गाने सुरू केलेल्या उद्योगामध्ये श्रेष्ठ वर्गातील ग्राहक मालाची खरेदी करीत नाही. त्यामुळे ग्राहक वर्गाची कायम समस्या निर्माण होतच असते.

**७) शेती विभागणीची समस्या :-**

दारिद्र्य गरीबी यामुळे कुटुंबाचा आकार मोठा असतो आणि वतनातून प्राप्त झालेली जी थोडीफार नापिकी जमिन प्राप्त झाली त्या जमिनीचे विभाजन कुटुंबातील प्रत्येक सदस्यांना फार अल्प येत असे. त्यामुळे या अल्प जमिनीतुन कुटुंबाचे भरणपोषण होत नसे. त्यामुळे या कुटुंबाला लाचारीचे जीवन जगावे लागत असे.

**८) गुन्हेगारीच्या प्रमाणात वाढ :-**

दारिद्र्य व गरिबीमुळे या समाजात गुन्हेगारीच्या प्रमाणात सतत वाढ होतांना दिसत आहे. ते सर्वेक्षणाव्दारे दिसून येते. रोजगारीच्या अभाव आणि शिक्षणाचा अभावामुळे या वर्गात चोरी, लुटमार इत्यादीचे प्रमाण वाढतांना दिसत आहे.

वरिलप्रमाणे अनेक प्रकारच्या आर्थिक समस्या धर्मांतरित बौध्दात आपल्याला दिसून येतात.

**संदर्भ सुची :-**

१. डॉ. मनोहर यशवंत, धम्मक्रांतीची पन्नास वर्षे
२. डॉ. आंबेडकर बाबासाहेब, बुध्द आणि त्याचा धम्म
३. मेट्रो टाईम्स, वर्ष तिसरा, अंक चौथा
४. श्री. पवार चोरटाकार

★★★